

आधिव्याधी मरणावरती
पाय अशा पुरुषाचा रे!

– मंगेश पाडगांवकर

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१ ऑक्टोबर २०२२
मूल्य रु. ४०
(एकूण पृष्ठे : ४४)

## जन्मशताब्दी वर्ष समाप्तीनिमित्त यदुनाथ थत्ते यांना विनम्र अभिवादन




यदुनाथ थत्ते यांच्या दोन लेखांची पुनर्भेट

१. तीन गुरुजी

२. ते दोन प्रवाह एकत्र येण्यात देशाचे कल्याण

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
१ ऑक्टोबर २०२२
वर्ष ७५ / अंक - ७

संपादक :
**विनोद शिरसाठ**
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक, अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव, रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
(मुखपृष्ठावरील रेखाचित्र : संजय कुलकर्णी)

व्यवस्थापक आणि अक्षररचना : **सुरेश माने**

मुद्रितशोधन : **विनायक भंडारी**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, चंद्रशेखर जोशी, श्री.जे.प्रिंटर्स प्रा.लि. १४१६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 / Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph.No. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा वरील QR कोड स्कॅन करून, अथवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी. आणि मग नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

Follow us :
weeklysadhana.in
facebook.com/weeklysadhana/
twitter.com/WeeklySadhana
YouTube/WeeklySadhana

४ **तीन भूतपूर्व संपादकांचे शताब्दी वर्ष संपले**
– संपादकीय

७ **निवडणुका कशा जिंकाव्यात आणि देशाचं नुकसान कसं करावं**
– रामचंद्र गुहा

९ **साने गुरुजी, खांडेकर यांचा सच्चा वारसदार...**
– अरूण खोरे

१२ **तीन गुरुजी!**
– यदुनाथ थत्ते

१५ **हे दोन प्रवाह एकत्र येण्यातच देशाचे कल्याण**
– यदुनाथ थत्ते

१९ **आधिव्याधी मरणावरती पाय अशा पुरुषाचा रे!**
– मंगेश पाडगांवकर


२७ **कुडाळ ते हॉटेल सिंधुदुर्ग व्हाया डोंबिवली**
– प्रभाकर देसाई

३३ **डियर तुकोबा : संत तुकारामांशी मुक्त संवाद**
– संग्राम गोपीनाथ थोरात

३९ **आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल!!**
– राम शेळके

४१ **प्रतिसाद**
– बाळकृष्ण शिंदे, अॅड. देवदत्त परुळेकर

संग्राम गोपीनाथ थोरात




# डियर तुकोबा : संत तुकारामांशी मुक्त संवाद

जून महिन्याच्या अखेरीस महाराष्ट्रातून सर्व संतांच्या पालख्या पंढरपूरला निघाल्या असतानाच दुसरीकडे साहित्यक्षेत्रात याअगोदर 'फिलिंग अस्वस्थ' व 'ओह माय गोडसे' लिहिणाऱ्या विनायक होगाडे या पंचविशीतील तरुण लेखकाचे 'डियर तुकोबा' हे पुस्तक जून (२०२२ मध्ये) प्रसिद्ध झाले. हे पुस्तक मला प्राप्त होताच मी आध्यात्मिक ज्ञानवारीचा अनुभव घेतला आणि आषाढी एकादशीच्या निमित्ताने सदर लेख लिहिला.

**पूर्वजांचे प्रिय तुकाराम तरुणांचे 'डियर तुकोबा' झाले**

२१व्या शतकातील तरुणांचे व्यक्त होण्याचे माध्यम म्हणजे व्हाट्स्‌ॲप, ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्राम ही होत. मागच्या पिढीने तुकारामांची गाथा हातात घेऊन तिची पारायणे केली. तर आजची तरुण पिढी तुकोबांना सोशल मीडियावर शोधताना दिसते. असाच एक छान प्रयत्न विनायक होगाडे या तरुण लेखकाने केला आहे. पुस्तकाचे शीर्षक देतानाही त्याने 'प्रिय' हा शब्द न वापरता 'डियर' हा शब्द वापरलेला आहे. एका वेगळ्या धाटणीचे हे पुस्तक मुखपृष्ठावरुनच आपली नजर हटू देत नाही. त्यावरील तुकारामांची ध्यानमुद्रा भक्तीतील तादात्म्याची प्रचितीच देते. स्वतः लेखकाने जरी मुखपृष्ठावरील तुकोबांच्या छायाचित्राविषयी "मला जो बंडखोरपणा तुकोबांच्या दिसण्यात हवा होता, तो तिने (डिझायनर-निकिता वैद्य) फार सुंदरपणे रेखाटला आहे," असे म्हटले असले तरी मला व्यक्तिशः ते पटत नाही. तुकारामांची अध्यात्मातील तल्लीनता त्या फोटोत दिसून येते.

**आजचा युवक आणि डियर तुकोबा**

तसे तुकोबा सर्वांनाच प्रिय आहेत. २१व्या शतकातली तरुणाईही त्याला अपवाद नाही. तुकारामांच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाच्या गारुडाने आजच्या तरुणाईलाही व्यापले आहे. १६७ पृष्ठसंख्या असणारे हे पुस्तक लेखकाने तीन भागांमध्ये लिहिले आहे : 'तुकारामायण', 'मीडिया ट्रायल ऑन तुकोबा' व 'डियर तुकोबा'. लेखकाने ह्याला कल्पनाविलास म्हटले असले तरी ते आजच्या वास्तवाच्या पातळीवर अनुभवता येते हे पुस्तकाचे बलस्थान आहे. म्हणूनच पुस्तकाची पाठराखण करताना रंगनाथ पठारे

संत तुकारामांच्या व्यक्तित्वाची व कवित्वाची भुरळ त्यांना समकालीन असणाऱ्या संतांपासून; नेमाडे, चित्रे, पांगारकर, शेणोलीकर, नसिराबादकर अशा अनेक विद्वानांना, संशोधकांना पडली आहे. संत बहिणाबाई यांनी त्यांना 'तुका झालासे कळस' असे म्हटले. संत महिपतींना तुकारामांच्या चरित्राने आकर्षित केले. दिलीप चित्रे तुकारामांना 'Says Tuka' म्हणून इंग्रजीत घेऊन गेले; त्यांना तुकाराम हे मराठी भाषेचा मानदंड असणारे लेखक वाटतात. तुकोबांच्या गाथेकडे ते 'एकसंध महाकृती' आणि 'काव्यात्म आत्मचरित्र' म्हणून पाहतात. आ.ह. साळुंखे यांना तुकोबा 'विद्रोही' वाटतात. कीर्तनकारांना तुकोबांच्या अभंगांशिवाय निरूपण करणे अशक्य होते. २१ व्या शतकातील होगाडे नामक तरुण लेखकाला तुकोबा 'डियर' वाटले ह्यात मला तुकोबांच्या अभंगांबरोबरच होगाडे यांच्या कल्पकतेचेही कौतुक करावेसे वाटते.

म्हणतात, ''विनायक होगाडे यांनी त्यांना झालेले तुकाराम दर्शन आपल्यापर्यंत पोहोचविले आहे. ते अत्यंत प्रभावी व गुंतवून टाकणारे तर आहेच, खेरीज ते आपल्या मनात विचारांचे हिंदोळ-कल्लोळ मातविणारे आहे. चारशेवर वर्षांआधी तुकोबांनी आपल्यात पेरलेली सांस्कृतिक जनुके आजही आपल्यात वाहती असल्याने तुकोबा समकालीनच आहेत, हे ढळढळीत सत्य होय''.

**तुकारामायण**

या पहिल्या भागामध्ये लेखकाने म.गांधी, गाडगेबाबा, साने गुरुजी, संत कबीर, सॉक्रेटीस, भीमराव आंबेडकर, म.फुले, छ. शाहू महाराज, गॅलिलिओ, कर्मवीर भाऊराव पाटील यांची आणि तुकोबांची भेट काल्पनिक पद्धतीने काव्यातून रंगविली आहे. शास्त्रज्ञ, संत, लेखक ते समाजसुधारक या सर्वांचे कार्य आणि तुकारामांचे कार्य यांची सांगड घालताना लेखकाने नवनिर्मितीचा परमानंद घेतलेला आहे. आपल्या मनोगतात लेखक म्हणतो, ''हे लिखाण तुकोबांबद्दल असलेल्या आंतरिक उमाळ्यातून बाहेर आलेले आहे. ते उत्स्फूर्त होतं. लिहिताना मला स्वतःला किती मजा आली हे शब्दातीत आहे. याचं महत्त्वाचं कारण असं की, यात काळाचं बंधन पाळलेले नाही. ते जाणीवपूर्वक केलंय अशातला भाग नव्हे, पण तुकोबा कालातीत म्हणजे काळाच्या सीमा भेदणारे आहेत हे त्यामागचे कारण आहे. तुकोबांपेक्षा कित्येक वर्षे जुना सॉक्रेटीसही या लिखाणात आहे, आणि तुकोबांच्या नंतरचे गांधी, आंबेडकरही या लिखाणात आहेत. संत कबीर, संत गाडगेबाबा, साने गुरुजी असे बरेच महामानव यात तुकोबांबाबतच्या सुखसोहळ्यात सामील आहेत.'' (पृ.९) लेखकाने म्हटल्याप्रमाणे त्यांच्या मिलनाचा सोहळा अनुपम्य झालेला आहे. या कवितांच्या निमित्ताने गांधींचा चरखा, सत्य व अहिंसा धर्म; गाडगेबाबांचे स्वच्छतेचे महत्त्व, साने गुरुजींचे मातृहृदयी मन, कबीरांच्या भक्तीचा शेला, सॉक्रेटीसचे तत्त्वज्ञान, आंबेडकर यांचे संविधान, जोतिबांचा सार्वजनिक सत्यधर्म, शाहू महाराजांची सामाजिक समरसता, गॅलिलिओची दुर्बीण, कर्मवीरांचे स्वावलंबी शिक्षण नव्या तरुणाईला नव्या पद्धतीने अनुभवता येईल. तुकोबा आणि हे सारे महामानव यांच्यात लेखकाला समानतेचा धागा सापडतो. या साऱ्यांची व तुकोबांची भेट घालताना लेखकाने 'जाहली दोघांची। उराउरी भेट' व 'कौतुक आकाशा। आवरेना।।' ह्या दोन चरणांचा आवर्जून वापर केलेला आहे.

ह्या अलौकिक भेटींत म.गांधींना तुकोबांच्या गाथेत सत्यांश सापडतो म्हणून ते गाथेला उराशी धरतात. गाडगेबाबा तुकोबांचा वारसा पुढे चालविण्याचा वसा घेतात. आंबेडकर तुकोबांच्या विचारांना घेऊन पुढे चालल्यामुळेच समतेचा संगर सोपा झाल्याचे मान्य करतात. तर जोतीबा भेटीदरम्यान आपले 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक तुकोबांना भेट देतात. गॅलिलिओला तुकोबांच्या रूपाने विवेकाचे शिर शाश्वत असल्याची खात्री पटते. कर्मवीरांना तर तुकोबा 'माउली' वाटतात. त्यांना प्रेम, वात्सल्य, जिव्हाळा, आपुलकी, कणव, सहृदयता हे सारे तुकोबांच्या अंत:करणात सापडते. ह्या साऱ्या महामानवांची भावना कवी सार्थ शब्दांत मांडतो ती अशी -

१. म.गांधी म्हणतात -

''तुझीच रे गाथा। धरली उराशी।
साथ ती सत्याशी। बापू म्हणे।''

२. गाडगेबाबा म्हणतात -

''डेबू म्हणे तुका। तुझा हा वारसा।
आम्ही रे आरसा। तुक्याचा।।''

३. भीमराव म्हणतात -

''राहिलो मी उभा। तुझ्या खांद्यावर।
समता संगर। झाला सोपा।।''

४. गॅलिलिओ म्हणतात -

''बुडवली जरी। तुझी रे गाथा।
परी ताठ माथा। विवेकाचा।।''

५. कर्मवीर म्हणतात -

''भाऊराव म्हणे। तुझीच पुण्याई।
तूच खरी आई। सर्वांचीच।।''

तर दुसऱ्या बाजूला तुकारामांनीही ह्या महामानवांचे श्रेष्ठत्व मान्य करताना गांधींचे काम तर थोर आहेच, पण त्यांच्या मरणातही मर्म आहे; डेबूच्या कामातील जोश, कबीरांच्या दोह्यांचे कौतुक; तर सॉक्रेटीसला पत्नीचे व संसाराचे महत्त्व पटवून देतात, शूद्रांना जगण्यास लायक बनविल्याबद्दल भीमरावांची पाट थोपटतात; साने गुरूजींना तर तुकोबा म्हणतात, '''वाह वाह श्याम। हे बरे झाले। काम पूर्ण केले। चोखोबाचे।।'' असा सुंदर मेळ लेखकाने घातलेला आहे.

33

ह्या मिलनाच्या सोहळ्यात होगाडे कवी म्हणून सातत्याने डोकावताना दिसतात. या साऱ्या महामानवांच्या कार्याचा

त्यांनी सूक्ष्मपणे अभ्यास केलेला आहे. 'तुकारामायण' या भागामध्ये मी होगाडे यांना लेखक म्हणण्यापेक्षा कवी म्हणणे अधिक पसंत करेन. अल्पाक्षर रमणीयत्वाच्या माध्यमातून या कवीने कित्येक शतकांचा विवेकाचा इतिहास शब्दकुंचल्यात नेटका व नेमका पकडला आहे. कबीर, सॉक्रेटीस, शाहू महाराज व तुकोबा यांच्या भेटीबद्दल कवी म्हणतो,

१. कबीराबद्दल – "एक तो विद्रोही। एक बंडखोर।
भेटले अखेर। देहूकाशी।।"

२. सॉक्रेटीसबद्दल – "कल्पना सॉकृची। सामान बांधले।
भेटाया निघाले। दाभोलकरा।।"

३. शाहू महाराजांबद्दल– "थोपटली पाठ। तुकाने शाहूची। काढी शिवबाची। आठवण।।"

या महापुरुषांच्या भेटीतून कवीने एक शृंखला गुंफलेली आहे, सॉक्रेटीसला घेऊन दाभोलकर यांच्या भेटीला येणारे तुकाराम दांभिकतेचे किती कडवे विरोधक होते याचेच प्रत्यंतर घडते. गाडगेबाबांना घेऊन तुकडोजींकडे जाणारे, कर्मवीरांना जोतीबांकडे घेऊन जाणारे, जोतीबांना व शाहूराजांना भेटून या दोघांना घेऊन छ.शिवरायांना भेटायला निघालेले तुकाराम इथे समन्वयाचा केंद्रबिंदू वाटतात. कबीर, गाडगेबाबा, तुकडोजी, फुले, शाहू, आंबेडकर, सॉक्रेटीस, गॅलिलिओ, दाभोलकर असे विवेकाचे नवे प्रवाह महाराष्ट्राला या कवितेतून सापडतात. या साऱ्या प्रवाहांचे मूळ विवेकात आहे व या साऱ्यांचा केंद्रबिंदू तुकोबा आहेत. यातून तुकोबांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैविध्यपूर्ण पैलू उलगडताना दिसतात.

'तुकारामायण' हा भाग अप्रतिम साधलाय यात शंकाच नाही. पण तरीही मला या निमित्ताने अण्णा भाऊ साठे, कार्ल मार्क्स, सयाजीराव गायकवाड, ॲरिस्टॉटल यांची मात्र कविता वाचताना प्रकर्षाने आठवण होते. यांचा या भेटीत समावेश असता तर बरे झाले असते.

**मीडिया ट्रायल ऑन तुकोबा :**

आजच्या घडीला जर तुकोबा असते आणि त्यांच्यावर आरोप केले गेले असते; तर तरुणाईच्या हातातील सामाजिक समाजमाध्यमांवर काय प्रतिक्रिया उमटल्या असत्या? त्यांना तरुणांचा देश असणाऱ्या भारतातून पाठिंबा मिळाला असता. हे सारे काल्पनिक पद्धतीने मांडताना लेखकाने सुरेख मेळ साधलेला आहे. आजही तुकोबांना 'इंडिया'चा विरोध आणि 'भारता'चा पाठिंबाच मिळाला असता. हे सदर कल्पनेतून सिद्ध होते.

तुकोबांनी गायलेला 'वेदांचा तो अर्थ'!.... हा अभंग व्हिडिओद्वारे व्हायरल झाला आणि वादाला तोंड फुटले. फेसबुक, टीव्हीवरील सर्व ब्रेकिंग न्यूज, ट्विटर, व्हॉटस्‌ॲप, सगळीकडे ही बातमी पसरली. मंबाजी आणि रामेश्वर आदी लोक तुकारामांवर आधीपासूनच खार खाऊन होते. त्यात सदर व्हिडिओची भर पडल्याने सनातनी संतापले होते. पण तुकोबांवर निष्ठेने प्रेम करणारा जनसमुदाय त्यांच्या बरोबर होता ही तुकोबांची जमेची बाजू होती #TUKAMUSTBEPUNISHED या सनातन्यांच्या ट्रेंडसला वैतागून वारकऱ्यांनीही मग #WE SUPPORTTUKOBA च्या हॅशटॅगने प्रत्युत्तर दिलं. 'कर्मठ सनातनी विरुद्ध वारकरी' असा सामना सुरू झाला. मुका महार, नरहरी वाणी, जित्या लोहार, सावता, पांडू, धोंडू न्हावी, संताजी जगनाडे उर्फ संतू सगळेच तुकोबाचे सच्चे समर्थक होते. तुकाराम रिपोर्टर्सना सापडत नाहीत. "तुकाराम माध्यमासमोर का येत नाहीत? ते घाबरले का?" रिपोर्टर्सनी त्वेषाने विचारले ....मुका नावाच्या एका महार जातीच्या वारकऱ्यासमोर त्याने बूम माइक धरला होता. (पृ.५०) अशा प्रश्नांच्या सरबत्तीने मुक्याची दातखीळ बसते त्या वेळी नाराज झालेल्या मुक्याचे डोळे पुसून नरहरी "फेसबुकवर जाऊन तुकोबांच्या वॉलवर फेरफटका मारून काही अभंग वाच, तुला बरं वाटेल।"(पृ.५१) असे सांगतो तेव्हा तुकोबांच्या अभंगाच्या सामर्थ्याची लेखक होगाडे नव्याने जाणीव करून देतात असे म्हणावेसे वाटते.

कबीर, शेख महंमद, संत बहिणाबाई ही प्रतिभावंतांची फळी तुकोबांच्या समर्थनार्थ देहूला पोहोचते #TUKAVSVARNASHRAM या एक्स्क्लुझिव्ह महाचर्चेमध्ये बहिणाबाई शिऊरकर व शेख महंमद भाग घेतात, इकडे संतूने इंद्रायणीकाठी स्क्रीन लावून प्रोजेक्टरवर टीव्ही लावण्याची सोय केली होती, सारा गाव ही चर्चा ऐकण्यासाठी जमला होता. तुकारामांवर होणारे आरोप बाया-बापड्या स्वीकारत नाहीत. तुकारामांनी इंद्रायणीत बुडविलेल्या गहाणखतांविषयी 'पब्लिसिटी स्टंट' ... म्हणून मंबाजी हिणवतो त्या वेळी प्रतिक्रिया देताना दुर्गा म्हातारी कडकडा बोटं मोडत "घाणखतं तुकोबांनी बुडविली नसती तर आतापातूर काय जित्ती राहिली नसती बा म्या.... कर्ज फेडूस्तोवर तिरडी गाठली असती म्या... या बामणाला काय ठावं तुक्याचं उपकार!" अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया देते. पण

तुकोबाला या चर्चेत रस नाही. तो मात्र आवलीसोबत इंद्रायणीच्या डोहात पाय सोडून चांदण्यारात्रीचा आनंद घेत प्रणयगप्पांमध्ये विलीन झालेला दिसतो. यातून तुकोबांची कसल्याही व कुठल्याही प्रसंगातील अलिप्तता लेखकाने अधोरेखित केली आहे.

शेवटी तुकोबांना धर्मपीठासमोर उभा करून तुकाराम शूद्र असूनही कविता करतात, वर्णाश्रम धर्माला मोडल्याचे; तसेच आव्हान देतात, शूद्र असूनही ब्राम्हण वर्णीयांना स्वतःचे शिष्यत्व देतात असे आरोप केले जातात. ह्या साऱ्या आरोपांचे खंडन तुकाराम करतात. तिसऱ्या आरोपाविषयी तुकोबा म्हणतात, ''कुणी माझ्या पायाशी यावं हे माझ्या हातात नाही. मुळात वारकरी संप्रदायात सगळेच एकमेकांच्या पाया पडतात. समोरच्या व्यक्तीमधील ज्ञानीपणाला, चांगुलपणाला तो नमस्कार असतो. काही ब्रह्मणांना जर मी ज्ञानी वाटत असेल आणि तेही या जातीच्या मायाजाळातून बाहेर पडून माणसाच्या चांगुलपणालाच नमस्कार करणार असतील, तर विठ्ठल-विठ्ठल म्हणतात तो हाच... असं मला वाटतं...'' असा निक्षून सांगणारा साहित्यिक तुकाराम व्यवस्थेला नको असतो, म्हणूनच ''तुकाराम आंबिले यांना इथून पुढे कवित्व करता येणार नाही,'' अशी शिक्षा सुनावली जाते, त्यात सोशल मीडियावरील आजवरच्या साऱ्या कविता, पोस्ट डिलिट कराव्यात, यूट्यूबवरील व्हिडिओज, फेसबुकवरीज लाइव्ह व्हिडिओज साऱ्या कमेंट्स उडवून टाकाव्यात, कवितारूपी वेबसाइटचे काम थांबवावे असा आदेश त्यांना दिला जातो.

ठरल्याप्रमाणे तुकोबांनी आपल्या वह्या इंद्रायणीत बुडवल्या. तुकोबांच्या ह्या कृत्याने इंद्रायणीही शहारली, हे कृत्य करताना तुकोबांना स्वप्नात पांडुरंगासवे आलेल्या नामदेवांची आठवण झाली. लेखक म्हणतो, ''कवितेच्या वह्या बुडवायला लावून सनातन्यांनी एक प्रकारे तुकोबांच्या हृदयाचा लचकाच तोडला होता.'' त्यानंतर तुकोबा तेरा दिवस अन्न-पाण्याविना इंद्रायणीकाठी बसून राहतात त्या वेळी आवली म्हणते, ''आवो उठा आता.... झाल्या ना कविता बुडवून? की आता त्याचंही सुतक पाळत इथंच तेरावं घालायचं आहे? तुमच्या पायी इथं लोक भुकेले बसलेत. इतरांची सोडा, तुमची स्वतःची पोरं अन्नाचा घास गिळेनात! आता उठा... आणि माणसात या''. ''माणसाचं सोडा आवो... तिकडं घरच्या म्हशींनी तुमच्या मायेच्या स्पर्शाविना दूध दिलं नाही की चाऱ्याला तोंडही लावलेलं नाहीये.'' म्हणजेच आबालवृद्धांपासून, पोरा-ढोरांपर्यंत सर्व जणच तुकोबांच्या विरहात सामील झालेले दिसतात. आवलीलाही ह्या वह्यांचं महत्त्व माहीत होतं. ती नवऱ्यावर आगडपाखड करत असली तरी काव्याचं महत्त्व ती माउली जाणून होती. ती म्हणते, ''किती जरी झालं तरी ह्या वह्यांना मी जपत होते. ज्याच्यापायी नवऱ्याने सगळी सावकारी बुडवली त्या कवितांची किंमत मला कळत नसेल का? पाऊस आला तर या पोरांची डोकी भिजू नये म्हणून त्यांना पदर लावण्याआधी यांच्या वह्यांना मी जपायचे...'' अशा संवादांतून लेखकाने आवलीचे तुकारामांच्या कवित्वावरील प्रेमही वाचकांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

बारा दिवसांच्या उपोषणानंतर तेराव्या दिवशी ट्विटर आणि इतर सर्व सोशल मीडियावर 'तुका-म्हणे' हा हॅशटॅग ट्रेंड होऊ लागला. संताजी जगनाडे याने तुकोबांच्या चाहत्यांना आवाहन करून म्हटले, ''तुकोबांच्या कवितांवर हे बंदी घालू शकतात मात्र, माझ्या मनातून या कविता हे लोक कशा काढणार आहेत?''. त्यामुळे सर्व जण 'तुका-म्हणे' ह्या हॅशटॅगखाली मुखोद्गत असणाऱ्या कविता टाकू लागले. त्यामुळे काही काळ ट्विटरही क्रॅश झाले होते. पण ह्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे त्याच्या मालकाने युजर्सची गैरसोय होऊ नये म्हणून व पुनरुक्ती टळावी म्हणून ट्विटरच्या सोबत एक पीडीएफ जोडली या कारणाने सगळ्या जगाचं लक्ष तुकोबांच्या कवितेकडे वेधले गेले. रामेश्वर भट तुकोबांचे श्रेष्ठत्व मान्य करताना म्हणतो, ''समोरील जनसमुदाय एकमुखाने तुकोबांच्या कविता गातो आहे. त्यांच्या हृदयात या कविता रुतून बसल्या आहेत. या कविता कशा बुडतील? या जनसमुदायाने त्या तरल्या आहेत. लोकगंगेने त्या तरल्या आहेत. या कविता कधीच बुडू शकणार नाहीत याची उपरती मला झाली असून मी तुकोबांची माफी मागतो. ज्ञानदेवांचे खरे वारस तुकोबाच आहेत, हे मला पटलं. मी आता आजन्म तुकोबांच्या सेवेत राहीन.'' 'तुका आकाशाएवढा' म्हणजेच जगभर पसरला, 'तुका म्हणे' सोबत 'says tuka' नावाचा हॅशटॅगही ट्रेड होऊ लागला. तुकोबांनी तेराव्या दिवशी शेख महंमदाच्या हातून उसाचा रस घेऊन उपवास सोडला. सगळ्या टीव्ही चॅनलवर या सोहळ्याचे लाइव्ह कव्हरेज सुरू होते. 'कोण आहेत तुकाराम अंबिले'? इथपासून 'अशी तरली तुकोबांची गाथा' या प्रवासावर मीडयावाले टीआरपी लुटू लागले होते. तिकडे 'गुळ्या' इंद्रायणीच्या पाण्यात कविता तरल्याच्या आभासात हातात पाणी घेऊन 'कविता

कविता' म्हणत रममाण झाला होता.

तर दुसऱ्या बाजूला लेखकाने जनमानसातील तुकोबांच्या प्रतिमेवर समर्पक प्रकाशझोत टाकला आहे. दुष्काळात सावकार तुकारामांनी कर्ज माफ केल्यामुळेच आज आम्ही कुटुंबीय जिवंत असल्याचे सावता सांगतो, तर कविता करू पाहणारा संतू तुकोबांकडून स्फूर्ती घेतो. तर शेख महंमद मुलाखतीत म्हणतो, ''आज जे तुकोबांना अपराधी ठरवत आहेत, उद्या तेच त्यांच्या पायाशी येतील.'' हे सांगताना त्याने कबीराच्या आयुष्यातील दाखले दिले आहेत. पुढे रामेश्वर भट त्यांचा एकनिष्ठ शिष्य होतो ही त्याच्या बोलण्याची प्रचितीच आहे. तर तुकोबांचा छोटा भाऊ कान्होबाचेही मन लेखकाने उलगडले आहे. 'तुकोबादादा'नेच सारे खेळ शिकवल्याचे तो कबूल करतो. 'गुळ्या' हे पात्र तर कुणालाच जुमानत नाही. लौकिक अर्थाने वेडा असणारा हा 'गुळ्या' लहानपणापासून तुकोबांच्या दुकानातून गूळ खाणारा म्हणून त्याचे नाव 'गुळ्या' पडले. तो थोडा मनस्वी (वेडसर) असल्याने त्याला कुणाचेच भय नाही. तो बेदिक्कत तुकोबांचे अभंग म्हणू लागतो. त्यामुळे शिवरायांच्या स्वराज्यात जाण्यासाठी तुकोबांनी अस्मिता जागृत केलेले मावळे, वारकरी, नंदीबैलवाले, जोगते, वासुदेव, सूफी फकीर सारेच तुकोबांच्या समर्थनार्थ इंद्रायणीकाठी जमा होतात. त्यामुळे 'च्यानेलवाले'ही इंद्रायणीकाठी येऊ लागले.

होगाडेंचे 'डियर तुकोबा' वाचताना त्यांनी आवलीच्या व्यक्तिमत्त्वावर टाकलेला प्रकाश मला व्यक्तिश: खूपच भावला. आजपर्यंतच्या सर्व चित्रपटांतून, पुस्तकांतून आवली म्हणजे एक कजाग, कर्कश बाई म्हणून रंगवली गेली आहे. पण या पुस्तकात संत बहिणाबाई आणि आवली यांच्या संवादांतून तिचे अंतःकरण लेखकाने वाचकांच्या समोर उलगडले आहे. दोघींच्या संवादांतून 'सावकार तुकाराम ते कवी तुकोबा' हा जगद्गुरू तुकोबांचा प्रवास उलगडत जातो. 'दुष्काळ' ही सावकाराला कमविण्याची संधी, पण सहृदयी तुकोबा गुराढोरांना मरताना पाहून आंतर्बाह्य हेलावून जातात. आवली म्हणते, ''जसजसं हा बाबा लोकांना आवडू लागला आणि याची कीर्ती वाढू लागली आणि लांबून लांबून लोक याला भेटायला येऊ लागले तसतसं ही भटं-बामणं कीर्तन बंद पाडायला येऊ लागली. रात्री-अपरात्री धमक्यांचे फोन-मेसेजेस येऊ लागले.''. तर या दोघांच्या संसाराबद्दल बोलताना बहिणाबाई म्हणते, ''खरोखरच्या रखमाईचं पांडुरंगासोबत असंच भांडण हाय गं... जसं तुझं त्या तुकोबासंगं हाय...म्हणून तर ती रखमाई सोडून गेलीया... लांब... विठुबावर रुसून...''. असा हा संवाद वैश्विक-आध्यात्मिक पातळीवरून मानवी रुसव्या-फुगव्यांपर्यंत आणण्याचा खास प्रयत्न लेखकाने केला आहे.

**डियर तुकोबा**

सदर तिसऱ्या भागातून लेखकाने तुकोबांशी मुक्त संवाद साधला आहे. त्यांच्या कवितेतील 'क' ही न समजलेल्या सामान्य वारकऱ्यांना 'ग्यानबा तुकाराम' आत्मभानाच्या आचरणाचं सूत्र आहे हे कळतं; तेव्हा वारकरी संप्रदायाचे महत्त्व दुणावते. ''तुकोबा, कधीकाळी डेंजर ठरवलेल्या तुझ्या कवितांच्या ओळीच्या फटीमधून जग सारं पाहायचा प्रयत्न करतं,'' असे ज्या वेळी लेखक म्हणतो त्या वेळी कवितेचं महत्त्व अधोरेखित होते, आवलीविषयी बोलताना लेखकाने दरवेळी आवलीच्या पारड्यातच माप टाकलेले आहे. विठ्ठलाला दूषणं देणारी आवली तुकारामापासून दूर होते आणि तिच्या पायात मोडलेला काटा काढायला विठ्ठल गेला म्हणून रखुमाई निघून जाते. तेव्हा लेखक म्हणतो, ''तुकोबा, आता तू आणि तुझा तो विठ्ठल... बसा दोघं टाळ कुटत...''. पण असं असलं तरी तीन महिन्यांची पोटोशी असतानाही 'भांबनाथ' या डोंगरावर एकांतवासाच्या शोधात गेलेल्या तुकोबांना भाकरी घेऊन जाणारी प्रेमळ आवली लेखकाला ग्रेटच वाटते. सदर संवादातून तुकोबांचा निर्विकारपणा, कवीपण, संतपण, बंडखोरी वृत्ती, दुःखाच्या खाईतून उभारी घेणं या साऱ्यांविषयी लेखक तुकोबांशी बोलतो. पण सगळ्यात अखेरीस तो जेव्हा म्हणतो, ''तुकोबा, इतकं सारं फ्रस्ट्रेशन आणि त्रास सोसूनही कधीच फाशीचा दोर तुला आपलासा करावा वाटला नाही. मात्र लेखकालाच त्याचं साहित्य नष्ट करायला सांगणं म्हणजे आत्महत्या करायला सांगण्यासारखच!''. तेव्हा महाराष्ट्रातील निराश व नाराज होणाऱ्या शेतकऱ्यांपासून विद्यार्थ्यांपर्यंत सगळ्यांच्याच डोळ्यांत लेखक झणझणीत अंजन घालतो.

**युवकांचा 'आयडॉल' तुकोबा**

36

'आपुलाची वाद आपणाशी' असे १७व्या शतकात सांगणारा तुकाराम आजच्या २१व्या शतकातील युवकांच्या हातातील तांत्रिक उपकरणाच्या माध्यमातून 'आयडॉल' ठरलाय. त्यामुळेच विनायक नावाच्या नवागत लेखकाला

तुकोबाशी आत्मिक संवाद साधावासा वाटतो. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हॉटस्‌ॲप या नवनव्या फलकांवर व्यक्त होणारी तरुणाई, तुकोबांनाही त्यात शोधताना दिसते. लेखक म्हणून १७व्या शतकात व्यथा-वेदना भोगणारे तुकाराम आणि आजचे लेखक यांच्यात एक दृढ नातं तयार झालं आहे. या नात्यातूनच लेखक म्हणतो, "तुकादादा... देहूला जाईन. आधी इंद्रायणीला भेट देईन. डोहात हळुवार उतरेन, ओंजळभर पाणी घेईन नि डोळे मिटेन... इंद्रायणीच्या स्पर्शाची मनोभावे अनुभूती घेईन. कारण कवितांची बाडे बुडवताना तुझे अश्रूही त्यात मिसळले होते... ओलसर हात डोळ्यांवरून फिरवेन. गारवा अनुभवेन. थोडं शहारल्यासारखं होईल. मग सभोवार नीट पाहीन. एखाद्या तरंगात एखादी कविता अजूनही तरंगतेय का? थोडसं निरखून पाहीन...". एखादा वारकरी देहूला गेला तर तो मंदिरात जाईल, पण हा ज्ञानवंत वारकरी कवी म्हणून तुकोबांची व्यथा जाणण्यासाठी इंद्रायणीकाठी जायचं म्हणतोय. तेरा दिवस उपाशी राहणाऱ्या तुकोबांना त्याला अनुभवायचंय. ही तुकोबांची 'नाळ' अशा प्रकारे आजच्या युवकांशी जोडली गेलीय आणि तो त्यांचा 'आयडॉल' ठरलाय. आता कितीही संकटे आली तरी मागे हटायचे नाही! हा तुकोबांचा 'बाणा' घेऊन चालण्याचा संदेश लेखक यातून देतो.

**भाषाशैली**

आज दूरदर्शनवरील न्यूज चॅनेल्सवरील निवेदकांची भाषा पाहिली, ऐकली की, त्यांची कीव करावीशी वाटते. 'व्याकरणाचे नियम जणू आमच्यासाठी नाहीतच,' अशा आविर्भावातच हे निवेदक बोलत असतात. सदर पुस्तकातूनही नेमकी ती भाषा पकडण्याचे काम लेखकाने केले आहे. चॅनेलवरील चर्चेच्या वेळी मंबाजीला अँकर म्हणतो, "आपण त्यांना अडवूया नको!" किंवा तुकारामांच्या द्वेषापायी बोलताना मंबाजी म्हणतो, "घाबरला की काय तो, 'टूकराम'"? . तसेच लेखकाने तुकोबांच्या तोंडी "अरे, माझा घात करून तुकोबा फरार झालेत अथवा तुकोबांना विठ्ठल येऊन घेऊन गेला, अशी काहीबाही आवई हे लोक उठवतील... तेव्हा तेच खरं मानाल का?" हा संवाद देऊन त्यांनी तुकारामांच्या वैकुंठगमनावर अंगुलिनिर्देश केला आहे. टॅब, व्हॉटस्‌ॲप, ट्विटर, मेल, ट्रेंड, पीडीएफ, स्क्रोल, लाइव्ह, कव्हरेज, मोबाइल, टीव्ही, प्रोमोज, एक्स्क्लुझिव्ह महाचर्चा, प्रोजेक्टर, स्क्रीन, पब्लिसिटी, स्टंट, डिबेट, कमेंट, ब्रेकिंग न्यूज, कॅमेरा, व्हिडिओ, सोशल मीडिया, क्लिप, यूट्यूब, फेसबुक, फॉरवर्ड, बाइट, व्हायरल, रिपोर्टिंग, प्लॅटफॉर्म, पिक्चर, वेबसाइट, असे आजच्या तंत्रज्ञानाशी निगडित असणारे अनेक शब्द वापरून लेखकाने तुकारामांना तरुणाईशी जोडले आहे. तसेच #tukamustbepunished, #wesupportTukoba, #Tukavsvarnashram अशी ट्विटरची भाषा वापरून योग्य तो परिणामही साधला आहे.

लेखकाने योजलेली कवितेची भाषा तर अप्रतिम साधली आहे. तुकारामांनी धरलेला विवेकाचा मार्ग आणि त्याच मार्गावरून चालणारे महापुरुष यांची शृंखला लेखकाने छानपैकी गुंफलेली आहे. एका महापुरुषाकडून दुसऱ्या महापुरुषाकडे घेऊन जाण्याची लेखकाची लकब चपखल जुळलेली आहे. तुकोबांची आवली, भाऊरावांची लक्ष्मी, जोतीबांची साऊ, सॉक्रेटीसची झांटीपी यांच्या कार्यालाही लेखकाने कवितेतून स्नेहल सलामच केला आहे. तर 'डियर तुकोबा' या शेवटच्या भागातील लेखकाची पत्रात्मक पण संवादात्मक भाषा तर थेट काळजाला भिडते.

संत तुकारामांच्या व्यक्तित्वाची व कवित्वाची भुरळ त्यांना समकालीन असणाऱ्या संतांपासून; नेमाडे, चित्रे, पांगारकर, शेणोलीकर, नसिराबादकर अशा अनेक विद्वानांना, संशोधकांना पडली आहे. संत बहिणाबाई यांनी त्यांना 'तुका झालासे कळस' असे म्हटले. संत महिपतींना तुकारामांच्या चरित्राने आकर्षित केले. दिलीप चित्रे तुकारामांना 'Says Tuka' म्हणून इंग्रजीत घेऊन गेले; त्यांना तुकाराम हे मराठी भाषेचा मानदंड असणारे लेखक वाटतात. तुकोबांच्या गाथेकडे ते 'एकसंध महाकृती' आणि 'काव्यात्म आत्मचरित्र' म्हणून पाहतात. आ. ह. साळुंखे यांना तुकोबा 'विद्रोही' वाटतात. तसेच अनेक कीर्तनकारांना आजही तुकोबांच्या अभंगांशिवाय निरूपण करणे अशक्य होते. आणि आता २१व्या शतकातील होगाडे नामक तरुण लेखकाला तुकोबा 'डियर' वाटले ह्यात मला तुकोबांच्या अभंगांबरोबरच होगाडे यांच्या कल्पकतेचेही कौतुक करावेसे वाटते.

**डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात,** वाई
sangramthorat750@gmail.com,
Mob. 9604046084

**डिअर तुकोबा :** विनायक होगाडे
मधुश्री पब्लिकेशन, पुणे, पृष्ठे-१६०, मूल्य : २५० रु.